सरकार–वि–प्रकाश

निशाणी क्र. ०७.

DISTRICT COURT NAGPUR

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.०६ यांची साक्ष–**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

**नाव – निळकंठ मधुकर तांडेकर,**

**वय – ३३ वर्ष.**

**धंदा – मजुरी.**

**पत्ता – ब्राम्हणी, त. कळमेश्वर, जि.नागपूर.**

सरतपास सरकार तर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.ए.एस.बिहाऊत वकिलांमार्फत.

१) दिनांक ०२.०६.२०१७ रोजी पोलीस ठाणेमध्ये काम करित असतांना पोलीसांनी माझी सही एका कागदावर घेतली होती. पोलीसांनी माझेसमक्ष कोणतीही कार्यवाही केली नव्हती. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहिती नाही.

**(साक्षीदार हा त्याच्या पूर्वीच्या जबाबाप्रमाणे साक्ष देत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यास उलट तपासामध्ये विचारण्यात येणारे सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली. परवानगी देण्यात आली).**

२) हे म्हणणे खरे आहे की, मौजे ब्राम्हणी येथे हनुमान मंदिर आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०२.०६.२०१७ रोजी पोलीसांनी मला हनुमान मंदिरात बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा माझेसमक्ष तयार केला होता व त्याच्या सत्यतेबाबत मी त्यावर वाचुन समजुन सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

सरकार–वि–प्रकाश

निशाणी क्र. ०७.

उलट तपासणी आरोपीतर्फे सौ. ए.आर. यासतवार वकिलांचा पुकारा केला असता गैरहजर.

आरोपीने उलट तपास घेण्यास नकार दिला.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

समक्ष

दिनांक – १३/०८/२०१९. (ह.ना. पोले)

कळमेश्वर. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,

कोर्ट क्र. २, कळमेश्वर.

DISTRICT COURT NAGPUR

**सरकार–वि–प्रकाश**

**निशाणी क्र. ०७.**

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी खात्रीपूर्वक असे कथीत करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील साक्षपुरावा हे मुळ साक्षपुराव्या प्रतीप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

लिपीकाचे नाव – जी.एन. नागपुरे

DISTRICT COURT NAGPUR